**निबंधक , भागिदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाच्या कार्यकक्षेतील नाशिक, धुळे, नंदूरबार, व जळगाव जिल्हे सहायक निबंधक, भागीदारी संस्था, औरंगाबाद या कार्यालयाकडे वर्ग करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विधी व न्याय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः निभास-१२१४/११०/(४८/१४) कार्या-१७**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक: ०३ डिसेंबर, २०१५.

**वाचा :-** १) निबंधक, भागिदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. आस्था- ३८१३/धुजनं-औ/(४१/१३)/दोन/९२३, दि. १६.०२.२०१३.
२) निबंधक, भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. आस्था ३८१४/धुजनं-औ/२७१/(४१/१३)/का-२/५५५, दि. २३.०१.२०१४.

**प्रस्तावना :-**

निबंधक, भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे कार्यालय भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२, व मुंबई व्यापारेत्तर अधिनियम १९५९ या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी सन १९५८ साली स्थापन करण्यात आले आहे. भारतीय भागीदारी अधिनियम या केंद्रीय अधिनियमाची राज्यस्तरावरील अंमलबजावणी निबंधक, भागीदारी संस्था कार्यालयामार्फत करण्यात येते. राज्यभरातील उद्योगधंद्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन सन १९८५ साली निबंधक, भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाच्या अधिनस्त पुणे, औरंगाबाद व नागपूर येथे सहायक निबंधक, भागीदारी संस्था या प्रादेशिक कार्यालयांची स्थापना करण्यात आली आहे. सद्यस्थितीत नाशिक, धुळे, नंदूरबार व जळगाव हे जिल्हे निबंधक, भागीदारी संस्था, मुंबई यांच्या कार्यकक्षेत आहेत. सर्वसामान्य जनता व लोकप्रतिनिधी यांच्याकडून होणारी मागणी विचारात घेऊन हे जिल्हे मुंबई कार्यालयाच्या कार्यकक्षेतून वगळून या जिल्ह्यांना भौगोलिक दृष्टीने नजीक असणाऱ्या सहायक निबंधक, भागीदारी संस्था, औरंगाबाद या कार्यालयाच्या कार्यकक्षेत वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

निबंधक, भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यकक्षेत सध्या मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदूरबार व जळगाव या दहा जिल्ह्यांतील तर सहायक निबंधक, भागीदारी संस्था, औरंगाबाद या प्रादेशिक कार्यालयाच्या कार्यकक्षेत औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, परभणी व हिंगोली या आठ जिल्ह्यांतील भागीदारी संस्थांची नोंदणी व संस्थांच्या घटनेतील बदल व अनुषंगीक कार्यवाही करण्यात येते.

**निबंधक, भागीदारी संस्था, मुंबई यांच्या कार्यकक्षेतील नाशिक, धुळे, नंदूरबार व जळगाव हे जिल्हे भौगोलिक दृष्टीने नजीक असणाऱ्या सहायक निबंधक, भागीदारी संस्था, औरंगाबाद या कार्यालयाच्या कार्यकक्षेत दि. १ जानेवारी, २०१६ पासून वर्ग करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.**

या शासन निर्णयास अनुसरून उपरोक्त जिल्ह्यांतील भागीदारी संस्थांची नोंदणी व संस्थांचे घटना बदल व संबंधित बाबींची अंमलबजावणी विहित मुदतीत सुरळितपणे सुरु होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही निबंधक, भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई व सहायक निबंधक, भागीदारी संस्था, औरंगाबाद यांच्या स्तरावरून तातडीने करण्यात यावी.

निबंधक, भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई व सहायक निबंधक, भागीदारी संस्था यांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी आपल्या स्तरावरून या शासन निर्णयास आवश्यकती प्रसिद्धी द्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२०३१५१९५८४५१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Surendra Pandharinath Tavade

Digitally signed by Surendra Pandharinath Tavade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Legal Advisor Cum Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=07c23bb228262b1e187f5a83dd348d5e113d7d6419043655d13274c682cdf07c, cn=Surendra Pandharinath Tavade
Date: 2015.12.03 15:15:49 +05'30'

**( सु. पां. तावडे )**
विधि सल्लागार -नि- सह सचिव

**प्रत,**

१. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे स्वीय सहायक.
२. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे स्वीय सहायक.
३. मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक.
४. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे स्वीय सहायक.
५. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे स्वीय सहायक.
६. निबंधक, भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. सहायक निबंधक, भागीदारी संस्था, औरंगाबाद, पुणे, नागपूर.
८. महालेखापाल, एक (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
९. महालेखापाल, दोन (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर.
१०.महालेखापाल, एक (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई.
११.महालेखापाल, दोन (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, नागपूर.
१२.अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
१३.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१४.विधि व न्याय विभाग, कार्या- १, कार्या- २३, कार्या- २४.
१५.निवड नस्ती.